१५) **क्रियाशिल सभासद होण्यासाठी किमान अटी :**

क्रियाशिल सभासद होण्यासाठी बँकेच्या सामान्य सभासदास पुढील तक्त्यानुसार बँकेच्या ठेवींवर आधारित अटींची पुर्तता करावी लागेल.

| अ.क. | बँकेच्या ठेवी (कच्ची यादी तयार करणेच्या दिवशी) | किमान भाग भांडवल | किमान ठेवींची आवश्यकता | कर्ज |
|---|---|---|---|---|
| १. | रु.१०० कोटींपर्यंत | रु.१०००/- आणि | रु.१०००० किंवा | रु.५००००/- |
| २. | रु.१०० कोटींपेक्षा जास्त ते रु.५०० कोटींपर्यंत | रु.२५००/- आणि | रु.२०००० किंवा | रु.५००००/- |
| ३. | रु.५०० कोटी व त्यावरील | रु.३०००/- आणि | रु.३०००० किंवा | रु.१०००००/- |

**तरतूद १ :**

ठेव धारक म्हणजे ज्या सामान्य सभासदाची बँकेच्या सर्वप्रकारच्या ठेव खात्यांमधून सलग दोन वर्षाकरीता वर उल्लेख केलेप्रमाणे किमान रु.२०,०००/- इतकी एकूण ठेव स्वत:च्या नांवे अथवा ज्या संस्थेचा मालक/संचालक/पदाधिकारी/ट्रस्टी म्हणून प्रतिनिधीत्व करत असेल त्या संस्थेच्या/कंपनीच्या/ सोसायटीच्या/ट्रस्टच्या खात्यामध्ये आहे अशी व्यक्ती/संस्था.

**तरतूद २ :**

कर्जदार म्हणजे असा सामान्य सभासद की जो मागील दोन वर्षापासून वर नमूद मर्यादेपर्यंत कोणत्याही प्रकारचे कर्ज वापरत असेल.

१६) **क्रियाशिल सभासदांचे अधिकार :**

१) बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीमध्ये मतदान करण्याचा अधिकार. तथापी कोणत्याही व्यक्तीगत सभासदास प्रतिनिधीद्वारे मतदान करता येणार नाही.

तथापी कोणतीही संस्था, कंपनी, भागीदारी फर्म, नोंदणीकृत विश्वस्त संस्था यांना संचालक मंडळाच्या निवडणूकीमध्ये मतदान करणेसाठी प्रतिनिधीची नेमणूक करता येईल.

२) सामान्य सभासदांचे सदर पोटनियमामध्ये उल्लेख केलेले सर्व अधिकार क्रियाशिल सभासदास राहतील.

१७) **बँकेच्या निवडणूकांमध्ये मतदान करण्याचा अधिकार :**

१) क्रियाशिल सभासदांना त्यांनी कितीही भागभांडवल धारण केले असले तरी एका व्यक्तीस एक याप्रमाणे मताचा अधिकार राहील.

२) क्रियाशिल सभासद व्यक्तीस स्वत: मतदान करण्याचा अधिकार राहील. संस्था, कंपनी, भागीदारी फर्म, नोंदणीकृत विश्वस्त संस्था यांना संचालक